# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-१३२ दिनांक - ०४/०४/२०२४

**नवघर पोलीस ठाण्याच्या पोलीसांनी 'गांजा' या अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या इसमास ५ किलो ५०० ग्रॅम रक्कम १,०५,०००/- रुपये किमतीच्या गांजा अंमली पदार्थासह रंगहाथ पकडले.**

दिनांक ०३/०४/२०२४ रोजी पोलीस उपनिरीक्षक तुषार मोळोदे यांना बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, नवघर कॅबिन क्रॉस रोड, रेल्वे पटरी जवळील गटारीचे बाजुला भाईंदर पुर्व येथे इसम नामे - राजेंद्र उपेंद्र चौहाण, रा. विरार हा त्याचे ताब्यामध्ये गांजा हा अंमली पदार्थ चोरुन लपुन विक्रीकरीता घेवून येणार आहे. सदरची बातमी लागलीच पोउपनिरी/तुषार माळोदे यांनी दिवसपाळी कर्तव्य पोनि/अशोक कांबळे यांना कळवून तसेच सहा.पोलीस आयुक्त सो, यांना सदरचे इसमावर कारवाई करणेकरीता परवानगी मिळणेबाबत पत्रव्यहार करुन छापा कारवाई बाबत नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. धिरज कोळी यांचे मार्गदर्शन प्राप्त करुन पोनि/अशोक कांबळे, पोउनि/तुषार माळोदे, पोहवा/गणेश जावळे, पोहवा/कुमार राठोड, पोशि/अमित तडवी, पोशि/मुकेश निकम, पोशि/अमोल पाटील यांनी दिनांक ०३/०४/२०२४ रोजी २२.०५ वा. पंचांसमवेत नवघर कॅबिन रोड, रेल्वे पटरी जवळील गटारीचे बाजुला अंधारात सावधगिरी बाळगुन दबा धरुन थांबले असता, इसम नामे राजेंद्र उपेंद्र चौहाण, वय- २४ वर्षे, व्यवसाय- बिगारीकाम, रा. विरार पुर्व, ता.वसई जि.पालघर यास ०५ किलो ५०० ग्रॅम रक्कम १,०५,०००/- रुपये किमतीचा गांजा (कॅनबीस) अंमली पदार्थासह रंगेहाथ पकडुन त्याचे विरुध्द नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.क्र. ।। २२०/२०२४ गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (क),२० (ब) प्रमाणे गुन्हा नोंद करुन आरोपीत यास सदर गुन्हयात अटक करुन उल्लेखनिय कागमगिरी बजावली आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उप आयुक्त सो. परिमंडळ-१, मा. सहा. पोलीस आयुक्त सो. नवघर विभाग तसेच नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. अशोक कांबळे, पोउनि/तुषार माळोदे, पोहवा/०४००४ गणेश जावळे, पोहवा/०६१९८ कुमार राठोड, पोशि/१२०७८ अमोल पाटील, पोशि/१३१०८ मुकेश निकम, पोशि/१३०६९ अमित तडवी सर्व नेमणुक नवघर पो.ठाणे यांनी केली आहे.

**----0000----**